**महाराष्ट्र विधानपरिषद**
**पत्रक भाग दोन**
**बुधवार, दिनांक २६ जून, २०१९ /आषाढ ५, १९४१ (शके)**

६८. **विधानपरिषदेच्या विनंती अर्ज समिती, अशासकीय विधेयके व ठराव समिती आणि सभागृहाच्या पटलावर कागदपत्र ठेवणेबाबत समिती या तीन समित्यांवर "समिती प्रमुख" म्हणून तसेच विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीवर "विशेष निमंत्रित" म्हणून नामनियुक्ती केल्याबाबत.**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सर्व सदस्यांना कळविण्यात येते की, सन २०१७-२०१८ या वर्षासाठी गठीत केलेल्या विधानपरिषद विनंती अर्ज समिती, अशासकीय विधेयके व ठराव समिती आणि सभागृहाच्या पटलावर कागदपत्र ठेवणेबाबत समिती या समित्यांवर प्रथेनुसार तसेच नियमानुसार मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद हे "समिती प्रमुख" असतात. डॉ.नीलम गोऱ्हे यांची महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उप सभापती म्हणून दिनांक २४ जून, २०१९ रोजी मध्यान्होत्तर निवड झाली आहे. उपरोक्त समित्यांवर डॉ.नीलम गोऱ्हे, मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद या **"समिती प्रमुख"** म्हणून राहतील. तसेच विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीवर डॉ.नीलम गोऱ्हे, मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांची **"विशेष निमंत्रित"** म्हणून दिनांक २६ जून, २०१९ रोजी नामनियुक्ती केली आहे.

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : २६ जून, २०१९.

**जितेंद्र भोळे**
सचिव (का.),
महाराष्ट्र विधानपरिषद.

**प्रति :**

१. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
३. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव.
४. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
६. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
७. संगणक कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

------